**कार्यालय :- महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, गडचिरोली,**
जिल्हा कोषागार कार्यालयाजवळ, कॉम्पलेक्स, गडचिरोली.
ई-मेल-didic.gadchiroli@maharashtra.gov.in दुरध्वनी क्र.०७१३२-२२२७१७

आज़ादी का अमृत महोत्सव

दिनांक :- 01.12.2022

जा.क्र.जिउकेंग/नि.प्र.स.सभा/2022/676

प्रति,

मा.उद्योग सहसंचालक,
नागपूर विभाग, नागपूर.

विषय :- दिनांक 09.09.2022 रोजी जिल्हा निर्यात प्रचालन समिती सभेचे इतिवृत्त पाठविणेबाबत.

महोदय,

वरिल विषयान्वये दिनांक 09.09.2022 रोजी दुपारी 1.00 वाजता संपन्न झालेल्या जिल्हा निर्यात प्रचालन समिती सभेचे इतिवृत्त यासोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

करिता माहितीस सविनय सादर.

आपला विश्वासू,

सहपत्र :- वरिलप्रमाणे

महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र,गडचिरोली.

Scanned with CamScanner

**कार्यालय :- महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, गडचिरोली,**
जिल्हा कोषागार कार्यालयाजवळ, कॉम्पलेक्स, गडचिरोली.
ई-मेल-didic.gadchiroli@maharashtra.gov.in दुरध्वनी क्र.०७१३२-२२२७१७

आज़ादी का अमृत महोत्सव

## दिनांक 09.09.2022 रोजी मा.जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हा निर्यात प्रचालन समिती सभेचे इतिवृत्त

दिनांक 09.09.2022 रोजी मा.जिल्हाधिकारी, गडचिरोली, यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली यांचे कक्षेत दुपारी 1.00 वाजता जिल्हा निर्यात प्रचालन समितीची सभा घेण्यात आली. सभेत खालीलप्रमाणे अधिकारी / कर्मचारी व औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी हजर होते.

१) मा.संजय मीणा (भा.प्र.से) जिल्हाधिकारी, गडचिरोली.

२) श्री अतुल एस.पवार, व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, गडचिरोली.

३) श्री बस्वराज मास्तोळी, जिल्हा अधिक्षक, कृषि अधिकारी, गडचिरोली .

४) श्री युवराज टेंभुर्णे, व्यवस्थापक, जिल्हा अग्रणी बँक, बँक ऑफ इंडिया,गडचिरोली.

५) श्री अतुल बोमनवार, मे.अष्टभुजा केमीकल्स,इंडस्ट्रिज, MIDC गडचिरोली.

६) श्री लक्ष्मण व्ही.घोंगडे, उद्योजक, MIDC, गडचिरोली.

७) श्री आकाश अ. फुलझेले, उद्योजक, MIDC, गडचिरोली.

८) श्री संजय कातलवार, उद्योजक, MIDC, गडचिरोली.

९) श्री श्रीकांत भृगवार उद्योजक, MIDC, गडचिरोली.

सभेचे सुरुवातीस व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, गडचिरोली यांनी शासन निर्णय दिनांक १९/१०/२०२० नुसार जिल्हा निर्यात प्रचलन समिती गठीत करण्याचे उद्येश विषयी प्रस्तावना केली. व लगेच मा.अध्यक्ष महोदयांचे परवानगीने श्री पवार, व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, गडचिरोली यांनी उपस्थितांचे स्वागत केले व सभेला सुरुवात केली.

मा.जिल्हाधिकारी, गडचिरोली जिल्हयातील उत्पादन होणा-या राईस मिलबाबतची चर्चा केली. त्यामध्ये ब्लॅक राईस निर्मीतीसाठी प्राधान्य दिले जावे. हा भात सिरोंचा व एटापल्ली तालुक्यात उत्पादन होत आहे असे सांगीतले.

.. 2 ..

Scanned with CamScanner

उपस्थित उद्योजकांनी श्री अतुल बोमनवार यांनी गडचिरोली जिल्हयात दळणवळणाची सुविधेचा अभाव असल्यामुळे जिल्हयात पाहिजे तेवढे प्रमाणात उद्योग येत नसल्याचे सांगीतले.

मा.जिल्हाधिकारी यांनी उत्पादकांचा डेटा बेस तयार करण्यात यावा तसेच निर्यात प्रचालन योजनेची जास्तीत जास्त प्रसिध्दी करण्यात यावी, असे सांगीतले. व शेवटी मा.जिलधिकारी यांनी जिल्हयात निर्यातवृध्दी एक जिल्हा एक उत्पादन यासाठी दिनांक 11.10.2022 रोजी कार्यशाळेचे आयोजन करावे व त्यासाठी तज्ञ मार्गदर्शक बोलावून जिल्हयातील उद्योजकांना बोलविण्यात यावे, अशा सुचना दिल्या.

शेवटी मा.अध्यक्ष महोदयांचे परवानगीने श्री पवार, व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, गडचिरोली यांनी उपस्थित अधिकारी , कर्मचारी व उद्योजकांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

स्वा/-
**मा.अध्यक्ष,**
जिल्हा निर्यात प्रचालन समिती तथा
जिल्हाधिकारी, गडचिरोली.

अनुलखा
**सचिव,**
जिल्हा निर्यात समिती तथा
महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र, गडचिरोली.

Scanned with CamScanner